पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
ई-मेल - sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

# प्रेस नोट

दिनांक :— ०५/११/२०२४

## सराईत " हातभटटीवाले " याचेवर एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई.

मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांनी वाशिम जिल्हयातील सर्व प्रकारचे अवैध धंदे करणाऱ्या इसमांवर प्रभावी कारवाई करण्याचे त्यामध्ये विशेषत: अवैध हातभट्टी दारु,गाळप, वाहतुक, विक्री करणाऱ्याविरुध्द प्रभावी रेड करुन अवैध दारुचे व्यवसाय उच्चाटन करण्याचे व दारुबंदी मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे आदेश दिले होते. त्याच अनुषंगाने अवैध हातभट्टी दारुवाल्यांविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही राबवुन वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता सर्व ठाणेदारांना आदेशित करण्यात आले आहे.

**त्यास अनुसरुन खालील नमुद ईसमांविरुध्द MPDA कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात आल्या त्यामध्ये १)श्रीराम झामलाजी भोंगरे, वय ४५ वर्ष रा.बेलखेड, ता.कारंजा पो.स्टे. धनज व २) सुरेश रमेश राठोड वय ५५ वर्ष, रा.पिंपळगाव, ता.मंगरुळपीर, पो.स्टे.आसेगाव** हे गावठी हातभटटीची दारु तयार करुन आपआपल्या परिसरात अवैधरित्या गावठी दारु विक्री करीत होते. त्याचे या दारु व्यवसायामुळे गावातील व परिसरातील लोक व्यसनाधिन होत असुन, तरुण पीढी व्यसनाधिन, अक्रियाशील, होवुन त्यांचे आयुष्य उध्वस्त होत होते. व्यसनाधीनतेमुळे कौटुबीक कलह होवुन महिलांना मुलांना शारीरीक /मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते अशा हातभटीवाला विरुध्द कोणीही तक्रार देण्यास धजावत नव्हते सदर व्यक्तीच्या अशा कृत्यांमुळे सामाजीक स्वास्थ्य भंग होत होते.

सराईत हातभटटीवालयांनी गावठी हातभटटीची दारु तयार करुन गाळणे, वाहतुक करणे, विक्री करण्यापासुन परावृत्त व्हावे, सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा उत्पन्न न होण्यासाठी नमुद इसमास *महाराष्ट्र झोपडपटटी दादा, हातभटटीवाले व औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार,व्हिडीओ पायरेटस,वाळु तस्कर व अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (सुधारणा १९९६,२००९ व २०१५)* MPDA चे कलम ३(१) अन्वये कार्यवाही करुन स्थानबध्द करण्याबाबत स्थानबध्दतेचा (एमपीडीए) प्रस्ताव मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये तयार करण्यात आले. सदर प्रस्तावाचे अवलोकन करून मा. जिल्हादंडाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांचे समक्ष पुढील योग्य आदेशार्थ सादर केले.

मा. जिल्हादंडाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी सदर प्रस्तावाचे बारकाईने व कायद्याच्या तरतुदीचे योग्य अवलोकन करून सामाजीक शांतता राहावी जिवीत किंवा वित्त हाणी टाळण्याचे दृष्टीने प्रस्तावावरुन हातभट्टीवाला **स्थानबध्द ईसम — श्रीराम झामलाजी भोंगरे, वय ४५ वर्ष रा.बेलखेड, ता.कारंजा पो.स्टे. धनज व सुरेश रमेश राठोड वय ५५ वर्ष, रा.पिंपळगाव, ता.मंगरुळपीर, पो.स्टे.आसेगाव** याचेविरूद्ध स्थानबध्दतेचे आदेश पारीत करण्यात आले. यातील दोन्ही हातभट्टीवाला स्थानबध्द ईसम यांना वाशिम जिल्हा कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.

मा. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अनुज तारे यांच्या मार्गदर्शन व आदेशान्वये सन २०२४ मध्ये आजपावेतो एक वर्षापेक्षा कमी कालावधीत १० ईसमांविरुध्द MPDA कायद्या अंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे. ही आजपावेतो जिल्हयाच्या ईतिहासातील सर्वात मोठी प्रभावी कार्यवाही आहे.

मा. पोलीस अधिक्षक यांनी जनतेस आवाहन केले की, वाशिम जिल्हयात अशा प्रकारचे धोकादायक ईसम, हातभट्टी दारुवाले, गुंडगिरी करणारे, अवैध धंदे करणाऱ्या इसमाविरुध्द कठोर कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही कार्यवाही सत्र असेच सुरु राहणार असल्याचे संदेश मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी दिलेले आहेत.

सदर स्थानबध्दतेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक श्री अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती लता फड मॅडम, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले, सहायक पोलीस निरीक्षक गणेश हिवरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक खंदारे, पोलीस उप निरीक्षक वडतकर पो.स्टे. धनज, सहाय्यक पोलीस निरीक्षक इंगळे, पोलीस उप निरीक्षक राठोड पो.स्टे. आसेगाव, पो.शि.विजय नागरे स्थागुशा यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक,कार्यालय वाशिम